जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १९६ दिनांक - ३०/०३/२०२४**

सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बुलेट गाडीचे सायलेन्सर मध्ये फेरबदल करुन कर्कश आवाज करुन जोर जोरात दुचाकी पळविण्या-या वाहन चालकांवर कारवाई

दि.२७/०३/२०२४ रोजी रात्रौ २०/०० वा ते दि २८/०३/२०२४ रोजी ०६/०० वा पर्यत सिहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीत व़डगाव पुलाखाली मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ३,पुणे शहर यांचे आदेशान्वये नाकाबंदी लावण्यात आली होती.नाकाबंदी दरम्यान एकुण ११७ दुचाकी वाहने ताब्यात घेतली त्यांचेवर फॅन्सी नंबर प्लेट,ट्रिपलसिट वाहन चालविणे,विनापरवाना वाहन चालविणे,बुलेट वाहनाचे सायलेन्सरमध्ये Modification केलेबाबत कारवाई करण्यात आली.

एकुण ३३ बुलेट चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये विविध तरतुदीचा भंग केलेबाबत कारवाई केली त्यापैकी ११ वाहने मोटार वाहन कायदा कलम २०७ प्रमाणे त्याबाबत घेतली होती.त्यांचेवर Modified सायलेन्सर बसविलेबाबत कारवाई केली. संबधित बुलेट मालकाकंडुन त्यांचे बुलेटचे Modified केलेले सायलेन्सर काढुन घेतले त्याचप्रमाणे वाहन मालकांकडुन वाहनांना Original सायलेन्सर लावुन घेतले तसेच मोटार वाहन कायद्यामधील इतर तुरतुदीनुसार फॅन्सी नंबर प्लेट, ट्रिपलसिट, Modified सायलेन्सर बसविलेबाबत एकुण ५३,०००/- रु.दंड आकारण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ३,पुणे श्री.संभाजी कदम मा.सहा पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग अतिरिक्त पदभार सिंहगड रोड विभाग,पुणे शहर,श्री.भिमराव टिळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे श्री.विजय कुंभार, पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.राघवेंद्रसिंह क्षीरसागर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रविण जाधव ,सहा.पोलीस निरीक्षक निकेतन निंबाळकर, पोलीस उप निरीक्षक आत्माराम आहिरे सिहंगड रोड वाहतुक विभाग पोलीस अंमलदार धनंजय गिरीगोसावी, दयानंद काबळे, मल्हारी सोनकांबळे व आरसीपी ३ प्लाटुन यांचे पथकाने केली.